http://www.epitomejournals.com, Vol. 2, Issue 10, October 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# महिलांचा राजकीय सहभाग (जागतिक परिप्रेक्ष्यातून)



**प्रा.अनंत मदन आवटी**
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
श्री.व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगावराजा
जि.बुलडाणा

## Abstract

समाजात महिलांना किती उच्च राजकीय स्थान आणि समान राजकीय संधी मिळते हयावर त्या राजकीय समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. 'राजकारण म्हणजे पुरुषांचे क्षेत्र' ही प्रस्थापित मानसिकता असताना आणि निर्णयपक्रियेतील सर्वोच्च पदश्रेणीत स्त्रियांचे प्रमाण कमी असताना जागतिक पातळीवर पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष आणि महासचिव अशा जगातील मोठया पदांवर स्त्रियांनी विराजमान होणे ही निश्चितच ऐतिहासिक घटना ठरते. पण संपूर्ण जगातील कायदेमंडळाचे चित्र महिलांच्या दृष्टीने निराशाजनक आहे. संपूर्ण जगात पुरुष सदस्यांपेक्षा महिला सदस्यांचे प्रमाण कमी आहे. त्याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**Keywords :** राजकारण, समाज, पुरुष, महिला, जग

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

**Reseach Paper**

**प्रस्तावना :**

कोणत्याही विशिष्ट समाजाचे आरोग्य आणि सुख यांचा आरसा महिला आहेत, यात कोणतीही शंका नाही. समाजात महिलांना किती उच्च राजकीय स्थान आणि समान राजकीय संधी मिळते हयावर त्या राजकीय समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. महिलांचे राजकीय स्थान उंचावल्याशिवाय भारताचे अस्तित्व टिकणार नाही, असे मत महात्मा गांधी यांनी व्यक्त केले होते. पाश्चात्य जगतात फ्रेंच राज्यक्रांती होईपर्यंत स्त्री स्वातंत्र्याचा केवळ विचारसुध्दा झाला नव्हता, हे लक्षात घेतले पाहिजे (गोसावी, 2009:90). 6 व्या शतकातील स्वतंत्र समाजातील महान पुरस्कर्ता जॉन स्टुअर्ट मीलने महिला आणि पुरुषांच्या समतेचे समर्थन केले आहे (Shukla, 2007:1). स्त्रियांना स्वातंत्र्य द्यावे व शिक्षण, नोकरी आणि मतदान या बाबतीत पुरुषांइतकेच हक्क द्यावेत, असे ठामपणे मांडणारा जॉन स्टुअर्ट मिल हा पहिला पाश्चात्य राजकीय विचारवंत दिसून येतो (गोसावी, 2009:90)– 'Position of Women in Hindu Civilization' या ग्रंथात डॉ.ए.एस आळतेकर असे म्हणतात की, कन्फयुशियस, ॲरिस्टॉटल, मिल्टन, रुसो इत्यादींनी असे सांगितलेले दिसते की, स्त्रिया मुळात पुरुषांपेक्षा कनिष्ठ प्रतीच्या असतात त्यामुळे त्या नेहमी पुरुषांपेक्षा दुय्यम दर्जाच्या राहाव्यात (पाटील आणि जाधव, 2005:138). स्त्रिया आणि मुले यांना प्रौढ पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थान दिले जाते, हा मानवी जीवनाच्या इतिहासाचा एक भागच आहे.

मिलच्या लिखाणापर्यंत पाश्चात्य समाजाने स्त्रियांचे स्थान दुय्यम मानल्याचे दिसते. या विषमतेच्या समर्थनार्थ ज्या ज्या विचारवंतानी कारणे सांगितली, ती सगळीच हास्यास्पद वाटण्याजोगी आहेत. उदा. ॲरिस्टॉटल स्त्रियांना दुय्यम दर्जा देताना म्हणतो की, जननक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग हा दुय्यम दर्जाचा असतो. आवश्यक असलेली ऊर्जा निर्माण करण्यासाठी स्त्री सक्षम नसते. नवजात बालकाच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी लागणारी ऊर्जा पुरुषाकडून पुरविली जाते, स्त्रीकडून नाही. थॉमस हॉब्जसारखा विचारवंत तर असे म्हणतो की, परमेश्वरानेच स्त्रियांना पुरुषाचा मदतनीस असे स्थान बहाल केले आहे. लॉकच्या मते स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्री–पुरुष समानता या बाबतीत थोडी स्पष्ट असली तरी परिपूर्ण नाहीत; परंतु प्रत्यक्ष संसदेमध्ये स्त्री–स्वातंत्र्य आणि स्त्री–पुरुष समानता या विषयांवर तो स्त्रियांना निर्णयस्वातंत्र्य देण्याच्या विरुध्द भाषणे करताना दिसतो. त्याच्या मते स्त्री–पुरुष मिळून बनलेल्या मिश्र संसदेत स्त्रियांवर पुरुषांना आकर्षून घेणा–या गुणांचा प्रभाव अधिक पडून त्या आधारावर त्या निर्णय घेतील व पुरुष त्यांना तो घेऊ देतील. थोडक्यात असे दिसते, की प्लेटोपासून पुढे अनेक वर्षे कोणत्याही विचारवंताने स्त्री–पुरुष समानतेविषयी यथार्थपणे विचार केला नाही किंवा लिहिलेही नाही (गोसावी, 2009:90–91).

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## महिलांना मताधिकाराची प्राप्ती :

शतकानुशतके पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विचारांच्या चौकटीत स्त्रियांना अजुनही दुय्यम स्थान आहे. प्रत्येक देशातील अर्धी मानवशक्ती ही स्त्री शक्ती आहे. पण पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री शक्तीला बंदिस्त केल्यामुळे ही स्त्री शक्ती अडगळीतच पडली. त्याचे परिणाम गंभीर स्वरुपात पुढे आले. दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्री प्रश्नांना चालना मिळाली. इ.स. 1960 ते 1970 च्या दशकात स्त्री चळवळी जोमाने उभ्या राहील्या व त्यातून महिला सबलीकरणाचा विचार पुढे आला. इ.स. 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून पाळल्या गेले. तर इ.स. 1975 ते 1985 हे महिला दशक म्हणून घोषित केल्या गेले. इ.स. 1975, 1980, 1985 व इ.स. 1994 या वर्षी महिला परिषदा संपन्न झाल्या. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने महिला हक्क सनदेला दि. 18 डिसेंबर 1979 ला मंजुरी दिली.

19 व्या शतकात मतदानाचा अधिकार मर्यादित होता. बहुतांश देशात महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. महिलांना मतदानाचा अधिकार बहाल करणारे न्युझीलंड हे जगातील पहिले राष्ट्र आहे. 1893 साली न्युझीलंडने महिलांना मतदानांचा अधिकार बहाल केला (देवळाणकर, 2005:54). ऑस्ट्रेलियाने 1902, फिनलँडने 1906, जर्मनीने 1918, अमेरिकेने 1920, इंग्लंडने 1928, फ्रान्सने 1944, इटलीने 1945, पाकिस्तानने 1947, चीनने 1949 आणि भारताने 1950 मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्रदान केला. या पाश्र्वभूमीवर महिलांचा राजकीय सहभाग वाढला का? आणि महिला खरोखर सबल झाली का? याची चर्चा होणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष लोकशाहीचे माहेरघर मानल्या जाणा.या स्वित्झर्लंडमध्येही 1971 पर्यंत महिलांना मताधिकारापासून वंचित ठेवल्या गेले (चोरमारे, 2004:13), महासत्ता मानल्या जाणा.या संयुक्त राज्य अमेरिकेची राज्यघटना इ.स. 1787 मध्ये तयार झाली होती. पण तिथे मताधिकार मिळविण्यासाठी महिलांना इ.स. 1920 पर्यंत प्रतिक्षा करावी लागली. संसदीय लोकशाहीची जननी मानल्या जाणा.या इंग्लंडमध्ये इ.स. 1918 मध्ये महिलांना मताधिकार दिला गेला. इ.स. 1928 मध्ये स्त्री.पुरुष मताधिकाराच्या अटी सारख्या करण्यात आल्या (भोळे, 2004:268).

नव्वदीच्या दशकापासून 'लोकशाही' आणि 'लोकशाहीकरण' आणि 'स्त्री सक्षमीकरण' हे जागतिक पातळीवरील राजकीय चर्चाविश्वातील कळीचे शब्द बनले आहेत. स्पेन, पोर्तुगाल इत्यादी दक्षिण युरोपीय देशांपासून लोकशाहीकरणाच्या तिसऱ्या लाटेस आरंभ झाला. दक्षिण युरोपीय देशांत 1974 साली सुरू झालेली ही लाट लॅटिन अमेरिकन देश, पूर्व युरोप, सोविएत युनियन, दक्षिण आशियायी देश आणि आफ्रिकी देशांपर्यंत येऊन धडकली आणि तिने त्या त्या भागातील अनेक अधिकारशाहीवादी अशा बिगर लोकशाही राजवटी संपुष्टात आणल्या. लोकशाहीकरणासाठीचे हे सर्व उठाव लोकांच्या उत्स्फूर्त सहभागातून आणि आंदोलनातून तसेच नागरी समाजाच्या सक्रियतेतून निर्माण झाले होते. देशोदेशीच्या या लोकशाहीकरणाच्या लाटेत स्त्रियांचाही सहभाग लक्षणीय होता. बिगर शासकीय संघटना, स्वयंसाहाय्यी गट, कृतिगट, सामाजिक चळवळी, सोशल मीडिया, निवडणुका आदी माध्यमातून लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रिया सक्रिय झाल्या होत्या. स्त्रियांचा हा

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

सहभाग लोकशाहीकरणाला बळकटी आणणारा होता. देशोदेशीच्या या लोकशाहीकरणाच्या लाटेत स्त्रियांनी उचललेला वाटा लक्षात घेता लोकशाही राजकारणाला एक नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली. स्त्रियांच्या राजकारणातील वाढत्या सहभागामुळे लोकशाही राजकारण हे गुणात्मकदृष्टया बदलेल इतकेच नव्हे तर लोकशाहीची कल्पनाही अधिकाधिक आशयघन होत जाईल, असा आशावादही व्यक्त केला गेला. स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे राजकारणाचा नैतिक स्तर उंचावेल, ते उत्तरोत्तर अधिक सभ्य बनत जाईल. अशीही उमेद निर्माण झाली (सुमंत, 2014). पण स्त्रियांची कायदेमंडळातील महिला सदस्याची जागतिक सरासरी पुरुष सदस्यांच्या तुलनेत कमीच आढळते. त्यामुळे त्यांचा सहभाग पुरुष सदस्यांच्या तुलनेत कमीच आहे.

## जागतिक सरासरी (World Average):

इंटर पार्लमेटंरी युनियनच्या अहवालानुसार 31 जुलै 2010 रोजी कायदेमंडळातील महिला सदस्याची जागतिक सरासरी (World Average) पुढीलप्रमाणे होती.

**कायदेमंडळातील महिला सदस्यांची जागतिक सरासरी (World Average)**

| कायदेमंडळ सदस्यांची संख्या | एकगृही कायदेमंडळ /कनिष्ठ सभागृह | वरिष्ठ सभागृह | संयुक्तपणे दोन्ही सभागृहे |
|---|---|---|---|
| कायदेमंडळातील एकूण सदस्य | 39,178 | 6,895 | 46,073 |
| पुरुष सदस्य | 30,195 | 5,357 | 35,552 |
| महिला सदस्यांची संख्या | 8,983 | 1,538 | 10,521 |
| **महिला सदस्यांची टक्केवारी** | **22.9** | **22.3** | **22.8** |

(Women in parliaments, World Average (online), Available from:- http://www.ipu.org/wmn-e/world html, [Accessed 15th October 2016])

वरील तक्त्यामध्ये माहिला सदस्याची जागतिक सरासरी दर्शविण्यात आली आहे. जगातील विविध देशांच्या कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहातील एकूण सदस्याची संख्या 46,073 आहे. त्यापैकी केवळ 10,521 महिला सदस्या असून त्यांचे प्रमाण 22.8 टक्के एवढे आहे. संपूर्ण जगात पुरुष सदस्यांपेक्षा महिला सदस्यांचे प्रमाण 77.2 टक्क्याने कमी आहे. दोन्ही सभागृहातील महिला सदस्यांची तुलना केली असता असे आढळून येते की, कनिष्ठ सभागृहापेक्षा वरिष्ठ सभागृहातील महिला सदस्यांची सरासरी 0.6 टक्क्याने कमी आहे. संपूर्ण जगातील कायदेमंडळाचे चित्र महिलांच्या दृष्टीने निराशाजनक आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

**इ.स. 1945 ते 2005 या काळातील कायदेमंडळातील महिला सदस्याची जागतिक सरासरी (World Average)**

| वर्ष | 1945 | 1955 | 1965 | 1975 | 1985 | 1995 | 2000 | 2005 | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकगृही कायदेमंडळ/कनिष्ठ सभागृहातील महिला सदस्यांची टक्केवारी (%) | 3.0 | 7.5 | 8.1 | 10.9 | 12.0 | 11.6 | 13.4 | 16.2 | 22.9 |
| वरिष्ठ सभागृहातील महिला सदस्यांची टक्केवारी (%) | 2.2 | 7.7 | 9.3 | 10.5 | 12.7 | 9.4 | 10.7 | 14.8 | 22.3 |

¼स्त्रोतः Women in Parliaments, 1945-2005 online, Available from: http://www.un.org/womenwatch/daw/egm/eg/men/final Repart.pdf, [Accessed 1th October 2016])

वरील तक्त्यावरुन असे निदशर्नास येते की, 1945 ते 2015 या काळातील विविध देशांच्या कायदेमंडळातील महिला सदस्यांचे प्रमाण वाढत गेले असले तरी आजही ते पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.

इंटर पार्लमेंटरी युनियनच्या अहवालानुसार 31 जुलै 2010 रोजी विविध देशांच्या कायदेमंडळातील सदस्याची सरासरी पुढीलप्रमाणे होती.

**विविध देशांच्या कायदेमंडळातील महिला सदस्यांचा सहभाग**

| जागतिक क्रमवारी | देश | कनिष्ठ सभागृह | | | | वरिष्ठ सभागृह | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निवडणुका दिनांक | जागा | महिलांची संख्या | टक्केवारी | निवडणुका दिनांक | जागा | महिलांची संख्या | टक्केवारी |
| 1 | रवांडा | 16.09.2013 | 80 | 51 | 63.8 | 26.09.2011 | 26 | 10 | 38.5 |
| 2 | बोल्हिया | 12.10.2014 | 130 | 69 | 53.1 | 12.10.2014 | 36 | 17 | 47.2 |
| 3 | क्युबा | 03.02.2013 | 612 | 299 | 48.9 | ... | ... | ... | ... |
| 5 | स्विडन | 4.09.2014 | 349 | 152 | 43.6 | ... | ... | ... | ... |
| 7 | मेक्सिको | 07.06.2015 | 500 | 212 | 42.4 | 01.07.2012 | 128 | 43 | 33.6 |
| 14 | नार्वे | 09.09.2013 | 169 | 67 | 39.6 | ... | ... | ... | ... |
| 28 | अर्जेंटिना | 25.10.2015 | 257 | 92 | 35.8 | 25.10.2015 | 72 | 30 | 41.7 |
| 36 | स्वित्झर्लंड | 8.10.2015 | 200 | 64 | 32.0 | 23.10.2011 | 46 | 7 | 15.2 |
| 48 | नेपाळ | 19.11.2013 | 595 | 176 | 29.6 | ... | ... | ... | ... |
| 48 | ग्रेट ब्रिटन | 07.05. | 649 | 192 | 29.6 | उपलब्ध | 799 | 204 | 25.5 |

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2015 | | | | नाही | | | |
| 53 | अफगाणिस्तान | 8.09.2010 | 249 | 69 | 27.7 | 10.01.2015 | 68 | 18 | 26.5 |
| 63 | फ्रान्स | 10.06. 2012 | 577 | 151 | 26.2 | 28.09.2014 | 348 | 87 | 25.0 |
| 64 | कॅनडा | 19.10. 2015 | 338 | 88 | 26.0 | उपलब्ध नाही | 88 | 34 | 38.6 |
| 73 | चीन | 05.03. 2013 | 2959 | 699 | 23.6 | ... | ... | ... | ... |
| 77 | संयुक्त अरब आमीरात | 24.09. 2011 | 40 | 9 | 22.5 | ... | ... | ... | ... |
| 85 | पाकिस्तान | 11.05. 2013 | 340 | 70 | 20.6 | 05.03.2015 | 104 | 19 | 18.3 |
| 97 | सं.राज्ये अमेरिका | 04.11. 2014 | 433 | 84 | 19.4 | 04.11.2014 | 100 | 20 | 20.0 |
| 143 | भारत | 07.04. 2014 | 543 | 62 | 11.43 | 21.03.2016 | 245 | 27 | 11.02 |
| 185 | कुवैत | 27.07. 2013 | 65 | 1 | 1.5 | ... | ... | ... | ... |
| 186 | ओमेन | 25.10. 2015 | 85 | 1 | 1.2 | 07.11.2015 | 85 | 14 | 16.5 |
| 187 | हैती | 09.08. 2015 | 92 | 0 | 0.0 | 09.08.2015 | 22 | 0 | 0.0 |
| 187 | पलाऊ | 06.11. 2012 | 16 | 0 | 0.0 | 06.11.2012 | 13 | 3 | 23.1 |
| 187 | कतार | 01.07. 2013 | 35 | 0 | 0.0 | ... | ... | ... | ... |
| 187 | टोंगो | 27.11. 2014 | 26 | 0 | 0.0 | ... | ... | ... | ... |
| 187 | येमेन | 27.04. 2003 | 275 | 0 | 0.0 | 28.04.2001 | 111 | 2 | 1.8 |

(WORLD CLASSIFICATION-Women in national parliaments (online), Available from:-http://www.ipu.org/wmn-e/classif.htm] [Accessed 15th October 2016])

इंटर पार्लयामेंटरी युनियन च्या अहवालानुसार 2016 मध्ये महिला प्रतिनिधित्वाचे संपूर्ण जगाचे प्रमाण 22.8 टक्के आहे. विविध देशांच्या कायदेमंडळातील महिलांच्या संख्येची तुलना केली असता हे लक्षात येते की संपूर्ण जगात भारताचा 143 वा क्रम आहे. इतर देशांच्या तुलनेत रवांडामध्ये सर्वाधिक म्हणजे कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात 63.8 टक्के व वरिष्ठ सभागृहात 38.5 टक्के महिला सदस्या आहेत. नेपाळ, पाकिस्तान आणि चीनच्या कायदेमंडळात भारताच्या संसदेपेक्षा जास्त महिला सदस्या आढळून येतात. हैती, पलाऊ, कतार, टोंगो आणि येमेन या देशातील कायदेमंडळात एकही महिला सदस्या नसल्याचे दिसून येते.

संपूर्ण जगातील कायदेमंडळाचे चित्र महिलांच्या दृष्टीने निराशाजनक आहे. संपूर्ण जगात पुरुष सदस्यांपेक्षा महिला सदस्यांचे प्रमाण कमी आहे. विविध देशांच्या कायदेमंडळातील महिलांच्या

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

संख्येची तुलना केली असता हे लक्षात येते की संपूर्ण जगात भारताचा 143 वा क्रम आहे. नेपाळ, पाकिस्तान आणि चीनच्या कायदेमंडळात भारताच्या संसदेपेक्षा जास्त महिला सदस्या आढळून येतात. विकसित असणाऱ्या ग्रेट ब्रिटन (29.6 टक्के), फ्रान्स (26.2 टक्के), कॅनडा (26 टक्के), चीन (23.6 टक्के), अमेरिका (20 टक्के) या देशांच्या कायदेमंडळात महिला प्रतिनिधीची संख्या पुरुष प्रतिनिधींच्या तुलनेत कमीच आढळते.

भारतातही महिलांचा राजकीय सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमीच आढळतो. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान राजकीय अधिकार प्रदान केले. जात, धर्म, वर्ग, जन्मस्थान आणि शिक्षण किंवा संपत्ती हे आधार गृहित न धरता भेदभावरहित मताधिकार भारताच्या सर्व नागरिकांना प्रदान केला. राज्यघटनेत स्त्री व पुरुष यांचा दर्जा समान मानण्यात आला (एजाज, 2002:343). राजकीय व सामाजिक क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांइतकेच समान हक्क मिळाले (देवळाणकर, 2009:54). स्वातंत्र्योत्तर काळात भारतात संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकारणात प्रवेश होऊ लागला. संसद, राज्याची विधिमंडळे, केंद्रीय व राज्य मंत्रीपरिषदेत सुध्दा स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत नगण्य राहिली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकात लोकसभेतील महिला प्रतिनिधित्वाचे हे चित्र फारसे आशादायक नाही.

## निष्कर्ष :

समाजात महिलांना किती उच्च राजकीय स्थान आणि समान राजकीय संधी मिळते हयावर त्या राजकीय समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. 'राजकारण म्हणजे पुरुषांचे क्षेत्र' ही प्रस्थापित मानसिकता असताना आणि निर्णयपक्रियेतील सर्वोच्च पदश्रेणीत स्त्रियांचे प्रमाण कमी असताना जागतिक पातळीवर पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष आणि महासचिव अशा जगातील मोठया पदांवर स्त्रियांनी विराजमान होणे ही निश्चितच ऐतिहासिक घटना ठरते. पण संपूर्ण जगातील कायदेमंडळाचे चित्र महिलांच्या दृष्टीने निराशाजनक आहे. संपूर्ण जगात पुरुष सदस्यांपेक्षा महिला सदस्यांचे प्रमाण कमी आहे. समतेच्या अंगाने विचार करता पुरुषांची मक्तेदारी असलेल्या कुठल्याही क्षेत्रात स्त्रियांनी पाऊल टाकणे, सत्तास्थाने मिळवणे यांचे स्वागतच झाले पाहिजे. स्विडन, दक्षिण आफ्रिका, नार्वे, अर्जेटिना, कॅनडा, फ्रान्स, ग्रेटब्रिटन आणि इटली यासारख्या देशांमध्ये राजकीय पक्षानीच आपल्या उमेदवारांमध्ये महिलांना आरक्षण दिल्याने कायदेमंडळातील महिला सदस्यांची संख्या वाढली आहे. त्याचा विचार इतर देशांमध्ये आणि भारतातसुध्दा झाला पाहिजे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## संदर्भ

### मराठी संदर्भ

गोसावी, शरद, 2009, व्यक्तिस्वातंत्र्याची बदलती संकल्पना, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

चोरमारे, व्ही., 2004, स्त्री सत्तेची पहाट, कोल्हापूर, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस.

देवळाणकर, एस., 2005, समकालीन जागतिक राजकारण, औरंगाबाद, विद्या प्रकाशन

पाटील पी. आणि जाधव एस., 2005, भारतीय इतिहासातील स्त्रिया, कोल्हापुर, फडके, प्रकाशन.

भोळे भा.ल., 2004, शासन व राजकारण.तौलनिक अध्ययन, नागपूर, पिंपळापूरे ॲण्ड कं पब्लिशर्स.

सुमंत, यशवंत, 2014, स्त्रिया, निवडणुकीचे राजकारण आणि लोकशाहीकरण, दै. लोकसत्ता, दि. 26 एप्रिल 2014

### हिंदी संदर्भ

एजाज, तनवीर, 2001, ' महिलाओं के लिए आरक्षण' नारीवादी राजनीति.संघर्ष एवं मुद्दे इसमें प्रकाशित, (संपादक.आर्य, एस., मेमन, एन., और लोकनीता, जे.) दिल्ली, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय,

### इंग्रजी संदर्भ

Shukla, A.K., 2007, Political Status of Women, New Delhi, APH Publication.

Women in Parliaments, 1945-2005 online, Available from:- http://www.un.org/womenwatch/daw/egm/eg/men/final Repart.pdf, [Accessed 15th October 2016]

Women in parliaments, World Average (online), Available from:- http://www.ipu.org/wmn-e/world html, [Accessed 15th October 2016]

WORLD CLASSIFICATION-Women in national parliaments (online), Available from:-http://www.ipu.org/wmn-e/classif.htm] [Accessed 15th October 2016])

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.